जल जीवन मिशन अंतर्गत योजनांच्या संकल्पन कालावधीबाबत

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः जजीमि २०२०/प्र.क्र. १२३/पापु १०
सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
क्रॅाफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई
तारीख: ८ डिसेंबर, २०२१

वाचा-

१. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.जजमि-२०१९/ प्र.क्र.१३८/ पापु १० (०७),दि.०४.०९.२०२०
२. शासन पत्र, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.जेजेएम २०२०/ प्र.क्र.१२३/ पापु ०७, दि.२२.०१.२०२१
३. उप सचिव, राष्ट्रीय जल जीवन मिशन यांचे पत्र क्र.W-११०११/३८/२०२०-JJM-III -DDWS, दि.०८.११.२०२१

शासन परिपत्रक-

दि.२७-३०ऑक्टोबर,२०२१ दरम्यान केंद्रीय अधिका-यांच्या पथकाने राज्यातील जल जीवन मिशन अंतर्गत योजनांना भेटी देऊन राज्यातील योजनांच्या अंमलबजावणीबाबत काही महत्वाचे अभिप्राय संदर्भिय क्र.३ च्या पत्रान्वये सादर केलेले आहेत. त्यामध्ये CPHEEO (Central public health and environmental engineering organization) Manual नुसार जल जीवन मिशन अंतर्गत योजनांच्या संकल्पन कालावधीबाबत ३० वर्ष संकल्पनाच्या तरतूदीचे पालन करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. जल जीवन मिशन अंतर्गत तत्कालीन परिस्थिती विचारात घेता स्वतंत्र पाणी पुरवठा योजनांसाठी (Single Village Scheme) १५ वर्षे व प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांसाठी (Multi Village Scheme) ३० वर्षे संकल्पन कालावधी विचारात घेऊन योजनांचे संकल्पन करण्याबाबत या विभागाचे संदर्भिय क्र.२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. अर्थात असे असले तरीही CPHEEO Manual नुसार यातील काही मालमत्तांचे (उदा.पाईप्स इ.) आयुर्मान ३०वर्षापेक्षा जास्त असते.

आता केंद्र शासनाने संदर्भित क्र.३ दिनांक ०८.११.२०२१ च्या पत्रान्वये पाणीपुरवठा योजनांचा कालावधी तीस वर्ष असावा असे नमुद केले आहे, यानुसार योजनांच्या संकल्पन कालावधीबाबत केंद्र

शासनाचे अभिप्राय व मिशन अंतर्गत योजनांच्या दिर्घकालीन शाश्वततेकरीता, राज्यातील सर्व योजनांचा संकल्पन कालावधी (ज्या योजनांची निविदा प्रसिध्द करण्यात आलेली नाही, अशा सर्व योजना) तीस वर्ष विचारात घेऊन , योजनांचे संकल्पन करण्यात यावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२११२०७१३०५१९३३२८असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Saroj Rajesh Deshpande

Digitally signed by Saroj Rajesh Deshpande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6a31a46110f5bc3d6fc7bdf1d6619a227d04e20859a66b7faddf9190ac096802, cn=Saroj Rajesh Deshpande
Date: 2021.12.08 18:14:14 +05'30'

(सरोज देशपांडे)
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत-

१. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान मुख्य सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे वरिष्ठ स्वीय्य सहायक, मंत्रालय, मुंबई.
४. मिशन संचालक, जल जीवन मिशन (राज्य पाणी व स्वच्छता मिशन), बेलापूर, नवी मुंबई.
५. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
६. आयुक्त, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८. उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी (सर्व), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
९. कार्यकारी अभियंता / उप अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१०. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), जिल्हा परिषद (सर्व)
११. निवडनस्ती -कार्यासन- पापु १०